# प्रकरण-3 : राष्ट्रीय उत्पन्न :- (National Income)

व्याख्या : एका वर्षाच्या कालावधीत अर्थव्यवस्थेत उत्पादित केलेल्या आणि उपलब्ध असलेल्या वस्तू आणि सेवांचा प्रवाह म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न. (देशात उत्पादित केलेल्या सर्व वस्तू आणि सेवांचे पैशात व्यक्त केलेले मूल्य)

⇒ यामध्ये खंड, वेतन, व्याज, आणि नफ्याच्या स्वरूपात उत्पादन घटकांना मिळणाऱ्या मोबदल्याचा समावेश असतो.

⇒ सारांशाने एका वर्षाच्या कालावधीत उत्पादित होणाऱ्या सर्व अंतिम वस्तू व सेवांचे पैशातील मूल्य.

भारतीय राष्ट्रीय उत्पन्न समितीची व्याख्या :

एखाद्या विशिष्ट कालखंडात निर्माण करण्यात आलेल्या वस्तू आणि सेवांचे दुहेरी मोजदाद होवू न देता केलेले मापन.

राष्ट्रीय उत्पन्नाची वैशिष्ट्ये :-
i) प्रवाही संकल्पना
ii) पैशात व्यक्त केलेले मूल्य
iii) फक्त अंतिम वस्तू आणि सेवांच्या मूल्यांचा समावेश.
उदा: साखरेचे मूल्य निश्चित करताना उसाचे मूल्य विचारात घेत नाही.
iv) एकूण निव्वळ मूल्य - झीजखर्च किंवा घसारा मोजला जात नाही.
घसारा : भांडवली वस्तूंच्या वापराने त्यांची झालेली झीज ⇒ घसारा
v) निव्वळ विदेशी उत्पन्नाचा समावेश केला जातो.
vi) वित्तीय वर्ष — 1 एप्रिल ते 31 मार्च

राष्ट्रीय उत्पन्नाचा चक्रीय प्रवाह : अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पन्न व राष्ट्रीय खर्च यांचा सातत्याने चक्रीय प्रवाह सुरु असतो.

⇒ उत्पादन घटकांची मालकी कुटुंब संस्थेकडे असते, कुटुंब वस्तू व सेवांचे उपभोक्ते असतात.

⇒ उत्पादन संस्था वस्तू व सेवांचे उत्पादन करतात. व त्यांचा पुरवठा कुटुंब संस्थेला केला जातो.

**उत्पन्न** — विविध स्त्रोतातून मिळते - मजुरी/पगार, व्याज, देणग्या इ.

प्रकार- 2-

1) घटक उत्पन्न : घटक म्हणजे उत्पादनाचे घटक: भूमी, श्रम, भांडवल, उद्योजकता.

⇒ उत्पादन संस्था या घटकांच्या साहाय्याने उत्पादन करतात व या घटकांच्या मालकांना त्याची किंमत अदा करतात. ही किंमत उत्पादन संस्थेसाठी घटक खर्च व घटकांच्या मालकासाठी घटक उत्पन्न असते.
(Factor cost and Factor income)

भूमीमालकाला ⇒ खंडाच्या स्वरूपात
कामगाराला ⇒ मजुरीच्या स्वरूपात
भांडवल मालकाला ⇒ व्याजाच्या स्वरूपात
उद्योजकाला ⇒ नफ्याच्या स्वरूपात.

Scanned by CamScanner

२) गैरघटक उत्पन्न ⇒ कोणत्याही प्रकारचे काम/त्याग न करता प्राप्त होणारे. उदा. डोनेशन, कर, देणगी इ.

⇒ कोणत्याही उत्पादनाच्या घटकांचा वापर होत नाही.

⇒ यालाच हस्तांतरीत उत्पन्न असेही म्हणतात - कारण यात कोणत्या वस्तू व सेवांची निर्मिती होत नाही.

* राष्ट्रीय उत्पन्न मोजमापामध्ये घटक उत्पन्नाचा विचार केला जातो गैर घटक उत्पन्नाचा नाही.

## राष्ट्रीय

१) आर्थिक (देशांतर्गत) प्रक्षेत्र :

भारताचे आर्थिक प्रक्षेत्र = भारताचे भौगोलिक क्षेत्र + भारताची परदेशातील दुतावास व संबंधित सरकारी कार्यालये — भारतातील सर्व परदेशी दुतावास व आंतरराष्ट्रीय संघटनांची कार्यालये. तसेच पुढील बाबी.

i) भारताचा भूप्रादेशिक सागरी प्रदेश.

ii) भारतीय निवासींच्या मालकीची व इतर दोन किंवा अधिक देशादरम्यान वापरली जाणारी जहाजे व विमाने तसेच आंतरराष्ट्रीय सागरी प्रदेशात कार्य करणारी मासेमारी जहाजे तेल व वायू उत्खनन जहाजे इ. — देशांतर्गत उत्पादनात सर्व उत्पादन संस्थांनी (निवासी व परकीय मालकीच्या) निर्माण केलेल्या घटक उत्पन्नाचा समावेश असतो.

२) निवासी :

देशात राहणाऱ्या सर्व व्यक्ती व संस्था ज्यांचे आर्थिक हितसंबंध या देशात आहेत त्यांना या देशाचे निवासी समजले जाते. त्यामध्ये या देशाचे नागरिक तसेच देशात राहणारे परकीय (एका वर्षापेक्षा अधिक काळ राहणारे) या दोघांचाही समावेश असतो.

* निवासीमध्ये व्यक्ती तसेच संस्थांचा समावेश.
* भारतीय तसेच एक वर्षापेक्षा अधिक वास्तव्य असलेले परकीय
* भारतात कार्यरत परदेशी दुतावास तसेच आंतरराष्ट्रीय संस्थांची कार्यालये भारताचे निवासी नसतात पण त्यामध्ये काम करणाऱ्या परकीय तसेच भारतीय व्यक्ती निवासी असतात.
* जे कामगार सकाळी सीमा पार करून दुसऱ्या देशात कामासाठी जातात मात्र संध्याकाळी परत येतात त्यांना भारताचे निवासी समजले जाते.

* देशांतर्गत उत्पादाच्या संकल्पनेत तसेच गैरनिवासींना प्राप्त होणाऱ्या घटक उत्पन्नाचा समावेश होतो याउलट राष्ट्रीय उत्पादाच्या संकल्पनेत केवळ निवासींना प्राप्त होणाऱ्या घटक उत्पन्न

## राष्ट्रीय उत्पन्नातील विविध संकल्पना :

① मध्यमवर्ती वस्तू विरुद्ध अंतिम वस्तू

मध्यमवर्ती : एका उत्पादन संस्थेने दुसऱ्या उत्पादन संस्थेकडून पुनर्विक्रीसाठी खरेदी केलेल्या सर्व वस्तूंना —

या वस्तूंसाठी केलेला खर्च - मध्यमवर्ती खर्च.

सर्व वस्तूंच्या खरेदीवरील खर्च हा वस्तूच्या अंतिम मूल्याचा हिस्सा असतो.

अंतिम वस्तू : अशा सर्व वस्तू व सेवा ज्याची खरेदी उपभोगासाठी किंवा गुंतवणूकीसाठी केली जाते. पुनर्विक्रीसाठी नाही
उदा. घरगुती वापरासाठी खरेदी केलेल्या तसेच उत्पादन संस्थांनी खरेदी केलेल्या यंत्रे, उपकरणे, फर्निचर, वाहतूक साधने यासारख्या टिकाऊ वस्तू

## मूल्यवर्धित ची संकल्पना :

⇒ समजा एका गिरणीने १०,००० रु किंमतीचा गहू विकत घेतला – हा मध्यमवर्ती खर्च. समजा गिरणीने तयार केलेले पीठ १२,००० रु यांना विकले तर गिरणीचे प्रदानमूल्य १२,००० रु झाले. यामध्ये २००० रु यांचे मूल्यवर्धन झाले.

मूल्यवर्धित = प्रदान मूल्य – मध्यमवर्ती खर्च.

अशा रितीने काढलेल्या मूल्यवर्धिताला बाजारभावाला मोजलेले स्थूल मूल्यवर्धित म्हणतात.

### ब) स्थूल विरूद्ध निव्वळ :

⟹ घसारा वजा न करता मोजलेल्या मूल्यवर्धिताला स्थूलमूल्यवर्धित (Gross value added) म्हणतात.

⟹ घसारा वजा करून मोजलेल्या मूल्यवर्धिताला निव्वळ मूल्यवर्धित (Net value added) निव्वळ मूल्यवर्धित = स्थूल मूल्यवर्धित – घसारा

### क) बाजारभाव विरूद्ध घटक किंमत

⟹ खरेदीदार ज्या किंमतीला विक्रेत्याकडून वस्तू किंवा सेवा विकत घेतो - बाजारभाव

⟹ घटक किंमत म्हणजे उत्पादन प्रक्रियेत वापरल्या गेलेल्या सर्व घटकांना प्राप्त होणारा एकूण परतावा (खंड + मजुरी + व्याज + नफा)

⟹ वस्तू व सेवांवरील करामुळे किंवा अनुदानामुळे बाजारभाव वाढतो किंवा कमी होतो

⟹ कर वजा करून व अनुदाने मिळवून येणारी किंमत म्हणजे घटक किंमत (factor cost)

## * देशांतर्गत उत्पादाची संकल्पना

१) स्थूल देशांतर्गत उत्पाद - बाजारभावानुसार
२) निव्वळ देशांतर्गत उत्पाद - बाजारभावानुसार
३) स्थूल देशांतर्गत उत्पाद - घटक किंमतीनुसार
४) निव्वळ देशांतर्गत उत्पाद - घटक किंमतीनुसार

### ① स्थूल देशांतर्गत उत्पाद - बाजारभावानुसार.

देशाच्या आर्थिक प्रक्षेत्रातील सर्व उत्पादन संस्थांच्या एका वर्षातील बाजारभावाला मोजलेल्या स्थूल मूल्यवर्धिताच्या बेरजेला 'स्थूल देशांतर्गत उत्पाद' (Gross Domestic Price - MP) म्हणजेच देशाच्या आर्थिक प्रक्षेत्रात एका वर्षात निर्माण झालेल्या सर्व अंतिम वस्तू व सेवांच्या बाजारभावाची बेरीज. यालाच सकल घरेलू उत्पाद असेही म्हणतात.

* यामध्ये अप्रत्यक्ष कराच्या रकमेचा समावेश असतो.
* यामध्ये सरकारने दिलेल्या अनुदानाच्या रकमेचा समावेश नसतो.

बा.भा. स्थूल देशांतर्गत उत्पाद = ~~स्थूल~~ सर्व उत्पादन संस्थांच्या मूल्यवर्धितांची बेरीज.

Scanned by CamScanner

(mp) GDP = GNP - Net income from abroad.
(mp) GDP ±

② निव्वळ देशांतर्गत उत्पाद (बाजारभावानुसार) (Net domestic product at m.p)

→ देशाच्या आर्थिक प्रक्षेत्रातील सर्व उत्पादन संस्थांच्या एका वर्षातील बाजारभावाने मोजलेल्या निव्वळ मुल्यवर्धितांच्या बेरजेला 'निव्वळ देशांतर्गत उत्पाद असे म्हणतात. स्थुल देशांतर्गत उत्पादातून घसारा वजा केल्यास निव्वळ देशांतर्गत उत्पाद मिळतो.

बा.भा. निव्वळ देशांतर्गत उत्पाद = स्थुल देशांतर्गत उत्पाद - घसारा

③ स्थुल देशांतर्गत उत्पाद: (घटक किंमतीनुसार) (GDP at Factor cost)

देशाच्या प्रक्षेत्रातील एका वर्षाच्या कालावधीत उत्पादित केलेल्या सर्व अंतिम वस्तू व सेवांचे घटक खर्चानुसार येणारे पैशातील मूल्य म्हणजेच घटक किंमतीनुसार स्थुल देशांतर्गत उत्पाद होय.

स्थुल देशांतर्गत उत्पाद (घ.कि) = स्थुल देशांतर्गत उत्पाद (बा.भा) - अप्रत्यक्ष कर + अनुदाने

④ निव्वळ देशांतर्गत उत्पाद: (घ.कि) (NDP at Factor Cost)

देशाच्या प्रक्षेत्रातील एका वर्षाच्या कालावधीत उत्पादित केलेल्या सर्व अंतिम वस्तू व सेवांचे घटक किंमतीनुसार येणारे निव्वळ पैशातील मूल्य म्हणजे घ.कि नुसार निव्वळ देशांतर्गत उ.

निव्वळ देशांतर्गत उत्पाद (घ.कि) = निव्वळ देशांतर्गत उत्पाद (बा.भा) - कर + अनुदाने.

## राष्ट्रीय उत्पादाची संकल्पना :

राष्ट्रीय उत्पाद = देशांतर्गत उत्पाद - परदेशास प्रदान केलेले घटक उत्पन्न + परदेशातून प्राप्त घटक उत्पन्न.

① स्थुल राष्ट्रीय उत्पाद: (बा.भा.) (GNP at Market Price)

(बा.भा.) स्थुल राष्ट्रीय उत्पाद = स्थुल देशांतर्गत उत्पाद बा.भा + परदेशातून प्राप्त निव्वळ घटक उत्पन्न

② निव्वळ राष्ट्रीय उत्पाद (बा.भा) (NNP at Market Price)

(बा.भा.) ~~स्थुल~~ निव्वळ राष्ट्रीय उत्पाद = निव्वळ देशांतर्गत उत्पाद (बा.भा) + परदेश निव्वळ घ. उत्प

③ स्थुल राष्ट्रीय उत्पाद (घ.कि) (GNP at Factor Cost)

स्थुल राष्ट्रीय उत्पाद (घ.कि) = स्थुल देशांतर्गत उत्पाद (घ.कि) + परदेश निव्वळ घ. उत्पन्न

④ निव्वळ राष्ट्रीय उत्पाद (घ.कि.) (NNP at Factor Cost)

निव्वळ राष्ट्रीय उत्पाद (घ.कि) = निव्वळ देशांतर्गत उत्पाद (घ.कि) + परदेश निव्वळ घ उत्पन्न.

* घटक किंमतीला मोजलेल्या निव्वळ राष्ट्रीय उत्पादालाच 'राष्ट्रीय उत्पन्न' म्हणून संबोधले जाते.

राष्ट्रीय उत्पाद := स्थुल देशांतर्गत उत्पाद (बा.भा) - घसारा - कर + अनुदाने + परकीय नि.घ. उत्पन्न

Scanned by CamScanner

# राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याच्या पद्धती ·

१) उत्पादन पद्धत किंवा मुल्यवर्धित पद्धत
२) उत्पन्न /आय पद्धत
३) खर्च पद्धत

१) **उत्पादन पद्धत :** ह्या पद्धतीलाच मालसाठा पद्धत असेही म्हणतात ·
⇒ उत्पादनावर लक्ष केंद्रित
⇒ शेती, खाणव्यवसाय, यांत्रिक उत्पादन, लहान उपक्रम, वाणिज्य, वाहतूक व दळणवळण अशा विविध क्षेत्रात अर्थव्यवस्थेची विभागणी .
⇒ एका वर्षाच्या कालावधीत उत्पादित केलेल्या अंतिम व सेवांचे बाजारभावातील मुल्य मोजले जाते.
यामध्ये दोन पर्यायी पद्धती ·
1) अंतिम वस्तू पद्धती - मध्यम वस्तू व सेवांचे मुल्य विचारात घेतले जात नाही ·
2) मुल्यवर्धित पद्धती - उत्पन्नाची दुहेरी गणना टाळण्यासाठी ही गणना वापरतात - यामध्ये वस्तूचे प्रत्येक टप्प्यावर तिच्या मुल्यात झालेली वाढ विचारात घेतली जाते · थोडक्यात अंतिम वस्तू तयार होईपर्यंत प्रत्येक टप्प्यात झालेल्या वर्धित मुल्याची बेरीज करुन राष्ट्रीय उत्पादन काढले जाते·

२) **उत्पन्न पद्धती / आय पद्धत :** ह्या पद्धतीला घटक खर्चानुसार राष्ट्रीय उत्पन्न पद्धती म्हणतात·
⇒ या पद्धतीत एका वर्षाच्या कालावधीत देशातील नागरिकांना मिळणाऱ्या निव्वळ उत्पन्नाची बेरीज करून उत्पन्न काढले जाते·
⇒ GDPfc , NDPfc , GNPfc , NNPfc इ.
यावरून उत्पाद हे बाजारभावाला मोजलेले असते तर उत्पन्न हे घटक किंमतीना मोजलेले असते· यावरुन
i) स्थुल देशांतर्गत उत्पाद (घ.कि) म्हणजेच स्थुल देशांतर्गत उत्पन्न· (GDI)
ii) निव्वळ देशांतर्गत उत्पाद (घ.कि) म्हणजेच निव्वळ देशांतर्गत उत्पन्न (NDI)
iii) स्थुल राष्ट्रीय उत्पाद (घ.कि) म्हणजेच स्थुल राष्ट्रीय उत्पन्न (GNI)
iv) निव्वळ राष्ट्रीय उत्पाद (घ.कि) म्हणजेच ~~स्थुल~~ निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न (NNI)

या पद्धतीने उत्पन्नाचे मापन करताना : i) शिष्यवृत्ती, भेटी, देणग्या, निवृत्ती वेतन, बेकारी यासारखे हस्तांतरित उत्पन्न एकूण उत्पन्नातून वगळावे.
ii) गृहिणींच्या सेवा, शिक्षकांनी पाल्याला शिकवणे अशा विनामुल्य सेवा वगळाव्या.
iii) घर, गाडी, या सारख्या जुन्या वस्तूंची विक्री करुन जे उत्पन्न मिळते ते वगळावे.
iv) भाग आणि रोख्यांच्या विक्रीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश राष्ट्रीय उत्पन्नात करु नये.
v) प्रत्यक्ष करापासून शासनाला मिळणारा महसूल राष्ट्रीय उत्पन्नात धरु नये कारण महसूल म्हणजे शासनाला मिळणारे हस्तांतरीत उत्पन्न असते·

Scanned by CamScanner

v) स्वतःच्या उपभोगासाठी वापरलेल्या वस्तूंचे मूल्य आणि स्वतःच्या मालकीच्या घराचे मूल्य राष्ट्रीय उत्पन्नात मोजावे.

**खर्च पद्धती** :: एका वर्षाच्या कालावधीत देशात होणाऱ्या एकूण खर्चाचे मोजमाप.

⇒ सर्व व्यक्ती, उद्योगसंस्था, आणि शासनाने केलेल्या उपभोगावरील खर्चाची आणि गुंतवणूकीवरील खर्चाची बेरीज म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न.

$$NI = [C + I + G + (X - M) + (R - P)]$$

① खाजगी अंतिम उपभोग खर्च (C)
② स्थूल देशांतर्गत खाजगी गुंतवणूक खर्च (I)
③ सरकारी अंतिम उपभोग खर्च व गुंतवणूक खर्च (G)
i) प्रशासकीय सेवा, कायदा, आणि सुव्यवस्था, संरक्षण, शिक्षण इ. केलेला खर्च.
ii) गुंतवणूक खर्च - रेल्वे, पूल, रस्ते, धरणे, कालवे इ. वरील खर्च.
④ निव्वळ विदेशी गुंतवणूक / निव्वळ निर्यात (X - M)
* एका वर्षाच्या कालावधीतील देशाच्या निर्यात मूल्य व आयात मूल्यातील फरक.
⑤ निव्वळ प्राप्ती (R - P) -
* परदेशी नागरिकांनी देशात केलेला खर्च आणि देशातील नागरिकांनी परदेशात केलेला खर्च यातील फरक म्हणजे निव्वळ प्राप्ती.

**भारतातील राष्ट्रीय उत्पन्नाचे मोजमाप** → स्वातंत्र्यपूर्व काळातील
↓

① दादाभाई नौरोजी ⇒ राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याचा पहिला प्रयत्न : १८६७-६८
⇒ उत्पन्न : ३४० कोटी दरडोई उत्पन्न -
⇒ अर्थव्यवस्था - कृषी व बिगरकृषी क्षेत्र

② विल्यम डिग्बी ⇒ १८९७-९८ = राष्ट्रीय उत्पन्न - ३९० कोटी - दरडोई - १७ रु.

③ फिंडले शिरास ⇒ १९११ - रा. उ. - १९४२ कोटी दरडोई - ८० रु.

④ डॉ. व्ही के आर व्ही राव ⇒ १९२५-२९ — रा. रु. - २३०१ कोटी दरडोई - ७८ रु.
↳ सर्व प्रथम वैज्ञानिक पद्धतीने राष्ट्रीय उत्पन्नाची गणना तसेच राष्ट्रीय उत्पन्न लेखा प्रणालीचे प्रतिपादन केले म्हणून त्यांना ⇒ 'राष्ट्रीय लेखा प्रणालीचे जनक' (father of national income accounting.) असे म्हणतात.

⑤ आर. सी. देसाई - १९३०-३१ - रा. उ. २८०१ कोटी दरडोई उत्पन्न ७२ रु.

**स्वातंत्र्योत्तर काळातील**
↓

① राष्ट्रीय उत्पन्न समिती ⇒ स्थापना ४ ऑगस्ट १९४९ - पी. सी. महालनोबीस - अध्यक्षतेखाली
⇒ डी. आर. गाडगीळ व व्ही के आर व्ही राव सदस्य.
⇒ पहिला अहवाल - १९५१ मध्ये - अंतिम अहवाल १९५४ मध्ये.
⇒ ↓ १९४८-४९ या वर्षाचे राष्ट्रीय उत्पन्नाचे आकडे.
⇒ अंतिम अहवालात - १९४८-४९, ४९-५०, ५०-५१ साठी चालू व स्थिर

Scanned by CamScanner

किंमतीवर राष्ट्रीय उत्पन्नाची गणना केली (आधारभूत वर्ष १९४८-४९)

⇒ या समितीच्या शिफारशीनुसार १९५० मध्ये 'राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण' तर १९५४ मध्ये केंद्रिय सांख्यिकी संघटनेची स्थापना.

## केंद्रिय सांख्यिकीय कार्यालय : (CSO - Central Statistical office)

⇒ १९५४ - राष्ट्रीय उत्पन्न मोजमापासाठी सरकारी एजन्सी म्हणून केंद्रिय सांख्यिकीय संघटना

⇒ १९५५ - मध्ये कार्यारंभ

⇒ १९५१ मध्ये स्थापन करण्यात आलेली केंद्रिय सांख्यिकीय संस्था विख्यात वर्ग.

- CSO चे मुख्यालय - दिल्ली येथे. -
 औद्योगिक सांख्यिकीय विंग ⟶ कलकत्ता येथे.

कार्ये = ⇒ प्रमुख कार्य - राष्ट्रीय उत्पन्नाची गणना.

राष्ट्रीय उत्पन्नाचे आकडे 'राष्ट्रीय लेखा सांख्यिकी' या नावाने प्रकाशित करते.
पुढील प्रकारची आकडेवारी संकलित व प्रकाशित केली जाते.

i) राष्ट्रीय उत्पन्न
ii) वार्षिक औद्योगिक सर्वेक्षण
iii) औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक
iv) ग्राहक किंमत निर्देशांक (ग्रामीण, शहरी, व एकत्रित)
v) आर्थिक सांख्यिकी, सामाजिक सांख्यिकी.

## २) राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालय : (NSSO - National Sample Survey office)

⇒ १९५० मध्ये राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाची स्थापना (NSS)

⇒ १९७० - NSS ची पुनर्रचना करून 'राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटना')

⇒ सध्या राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालय :

⇒ NSSO मार्फत विविध प्रकारची नमुना सर्वेक्षणे केली जातात त्याचेचार प्रकार-1) घरगुती सर्वेक्षणे 2) उपक्रम सर्वेक्षणे 3) ग्राम सुविधा, 4) भूमी व पशुधन सुधारणा.

⇒ चार विभाग : 1) सर्वे डिझाईन व रिसर्च विभाग - कोलकाता (SDRD)
 → पहाणी नियोजन व अहवालांचे विश्लेषण.
 2) फिल्ड ऑपरेशन विभाग - नवी दिल्ली व फरिदाबाद (FOD)
 → आर्थिक व सामा. पाहणी व औद्योगिक आकडेवारी.
 3) डाय प्रोसेसिंग विभाग - कोलकाता (DPD)
 → माहितीचे विश्लेषण, प्रक्रिया व प्रसारण.
 4) समन्वय व प्रकाशन विभाग - नवी दिल्ली (CPD)
 → सर्व विभागात समन्वय - वर्षातून दोनदा माहिती प्रसारण.

कार्ये : i) सामा व आर्थिक सर्वेक्षणे : घरगुती उपभोग खर्च, रोजगार, भूमी व पशुधन, सामाजिक उपभोग (शिक्षण व आरोग्य), दारिद्र्य, बालकामगार, साक्षरता शेतकरी

ii) दर पाच वर्षांनी घरगुती उपभोग खर्चाच्या आकडेवारीचे पंचवार्षिक सर्वेक्षण :

iii) वार्षिक औद्योगिक सर्वेक्षणासाठी आकडेवारीचे संकलन

iv) कृषी सर्वेक्षणे.

Scanned by CamScanner

NSSO - संपूर्णपणे राष्ट्रीय सांख्यिकी आयोगाच्या निर्देशाने काम करते.

## राष्ट्रीय सांख्यिकी आयोग : (National Statistical Commission)

⇒ जानेवारी २०००मध्ये डॉ. सी रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली 'राष्ट्रीय सांख्यिकीय आयोग' स्था.
⇒ देशातील सांख्यिकीय व्यवस्थेचे परिक्षण करुन त्यातील कमतरता दूर करण्यासाठी उपाययोजना सुचविण्याचे काम आयोग.
⇒ त्यानुसार १२ जुलै २००६ रोजी कार्यमस्वरूपी 'राष्ट्रीय सांख्यिकीय आयोगा'ची स्थापना प्रो. सुरेश तेंडूलकर यांच्या अध्यक्षतेखाली.
⇒ आयोगाचे अध्यक्ष हे तज्ञ संख्याशास्त्रज्ञ किंवा समाजशास्त्रज्ञ असून अंशकालीन अध्यक्ष म्हणून काम पाहतात. किमान वय ५५ वर्षे, पदावधी ३ वर्षे किंवा वयाची ७० वर्षे पूर्ण होईपर्यंत
⇒ फेब्रुवारी २०१३ पासून डॉ. प्रणब सेन - अंशकालीन अध्यक्ष म्हणून कार्यरत होते.
⇒ त्यांच्या निवृत्तीनंतर ४ मे २०१६ पासून राधा विनोद बर्मन हे अध्यक्ष.

## भारतीय अर्थव्यवस्थेची ठळक वैशिष्ट्ये :

① दरडोई उत्पन्नाचा कमी स्तर : २०१५-१६ = चालू किंमतीला मोजलेले दरडोई निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न ९३,२३१ रु./वर्ष.

② उत्पन्नाच्या व दरडोई उत्पन्नाच्या वाढीचा दर कमी : = १९५० ते १९८० च्या दशकापर्यंत GDP वाढीचा सरासरी दर : ३.५%.
दरडोई उत्पन्न वाढीचा - १.३%.
याला हिंदू वृद्धी दर असे म्हणतात.

③ कृषी क्षेत्राचा अर्थव्यवस्थेवरील प्रभाव : ⇒ मोठा गट कृषी व संलग्न कार्यात परंतु जीडीपीतील योगदान कमी - विकसनशील अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे लक्षण
⇒ भारतीय अर्थव्यवस्था - कृषीधारित
१९५१ मध्ये ७०% जनता कृषी व संलग्न क्षेत्रात.
⇒ GDPतील कृषी क्षेत्राचा हिस्सा २०१४-१५ मध्ये १६.११%.
कामगार लोकसंख्या - २०१५-१६ — ४६.१%.

④ आर्थिक विषमता : ग्रामीण कुटुंबापैकी ३९% कुटुंबे देशातील एकूण ग्रामीण मालमत्तेपैकी फक्त ५% मालमत्तेचे मालक आहेत. तर त्यांच्यापैकी ८% उच्च कुटुंबे ४६% मालमत्तेचे मालक आहेत.
उत्पन्नाच्या विषमतेचे प्रमाण मोजण्यासाठी लॉरेंझ वक्र व त्यावरुन काढलेला गिनी गुणांक यांचा वापर केला जातो.

**गिनी गुणांक** : उत्पन्नाची तफावत मोजण्यासाठी गिनी गुणांक किंवा गिनी निर्देशांक मोजता
⇒ 2016 च्या मानव विकास अहवालानुसार, अमेरिकेचा गिनी गुणांक - 41.1 तर नॉर्वेचा 25.9 व भारताचा 35.2 आहे. (2005 ते 2015 - पाहणी अहवाल)
गिनी गुणांक 0 म्हणजे आर्थिक विषमता कमी व 100 म्हणजे आर्थिक विषमता सर्वाधिक.

Scanned by CamScanner

यावरून भारतामध्ये अमेरिकेच्या तुलनेत आर्थिक विषमता कमी आहे.

⇒ गिणी गुणांकासाठी एक आलेख काढतात. 'क्ष' अक्षावर कमी उत्पन्न मिळवणाऱ्या लोकांचे संख्येपासून जास्त उत्पन्न असणाऱ्या लोकांचे लोकसंख्येतील प्रमाण मांडले जाते व 'य' अक्षावर उत्पन्नातील वाटा मांडला जातो.

⇒ आर्थिक असमानता मोजण्यासाठी हल्ली Income Quintile Ratio मोजला जातो. त्यास उत्पन्न पंचमक गुणोत्तर म्हणतात.

शंभराचे पाच गट म्हणजे पंचमक या पाच गटांपैकी म्हणजे लोकसंख्येपैकी 20% सर्वाधिक श्रीमंत लोकांच्या सरासरी उत्पन्नाचे 20% सर्वाधिक गरिब लोकांच्या सरासरी उत्पन्नाशी गुणोत्तर मोजले जाते. 2016 नुसार भारताचे 2005 ते 2015 चे गुणोत्तर 5:3 होते.

⇒ पाल्मा (2011) या तज्ञाने आर्थिक असमानता मोजण्यासाठी पाल्मा गुणोत्तर शोधून काढले. 10% सर्वाधिक श्रीमंत लोकांच्या देशांच्या GNI पैकी असलेल्या उत्पन्नाच्या वाट्याचे 40% गरिब लोकांच्या उत्पन्नाच्या वाट्याशी असलेले गुणोत्तर. 2016 - भारताचे पाल्मा गुणोत्तर - 1:5

⇒ भारतीय अर्थव्यवस्थेत 'मध्यम स्वरूपाची उत्पन्न असमानता' आहे.

⑤ लोकसंख्येचा विस्फोट :
१९०१ ⇒ २३.८४ कोटी
२०११ ⇒ १२१.०२ कोटी
} १९९१ पासून लोकसंख्या वाढीचा दर कमी होत असल्याचे आढळून येत आहे.

⇒ १९९१ ते २००१ - दशकात लोकसंख्या वाढीचा दर ⇒ २१.५४%
वार्षिक ——"—— ⇒ १.९५%
⇒ २००१ ते २०११ - दशकात ——"—— ⇒ १७.६४%
⇒ २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या जागतिक लोकसंख्येच्या १७.५% एवढी.
क्षेत्रफळ ——"—— क्षेत्रफळाच्या २.४२%

एकूण लोकसंख्येपैकी ⇒ १५ वर्षाखालील ⇒ ३५%
२५ वर्षाखालील ⇒ ५०%
३५ वर्षाखालील ⇒ ६५%

⑥ गरिबी व बेरोजगारी :-
२०११-१२ - NSSO च्या ६८ व्या फेरीच्या आकड्यावरून सुरेश तेंडुलकर पद्धतीनुसार दारिद्र्य रेषेखाली लोकसंख्येचे प्रमाण २१.९% (ग्रामीण २५.७ तर शहरी १३.७%)

⑦ भांडवल निर्मितीचा दर कमी
प्रकल्प व मशिनरीमध्ये गुंतवणूक होवून स्थिर उत्पादक मालमत्ता निर्माण होण्याच्या प्रक्रियेला भांडवल निर्मिती म्हणतात. भारतात बचत दर कमी असल्याने गुंतवणूक दरही कमी असतो. त्यामुळे भांडवल निर्मितीचा दर कमी, त्यामुळे कमी राष्ट्रीय उत्पन्न, कमी दरडोई उत्पन्न. भारतीय भांडवल लाजरे आहे असे म्हटले जाते ⇒ कारण i) भांडवल गुंतवणूकीतील धोका
ii) कमी नफा असतो
iii) गुंतवलेले भांडवल पुन्हा प्राप्त करणे अवघड

⑧ औद्योगिकरणाचा अभाव :

⑨ पायाभूत सुविधांची कमतरता : रस्ते, रेल्वे, बंदरे, विमान, वाहतूक, दूरसंचार, खाणे, सिंचन, बँकिंग

Scanned by CamScanner

व वीमा या पायाभूत सुविधांची कमतरता : प्रगतीत अडसर.

(१०) मानवी संसाधनाचा निकृष्ट दर्जा : मानवी संसाधन साक्षरता, अंगीकृत कौशल्ये, आरोग्य स्वच्छता, आयुर्मान इ. बाबींवर आधारित असते - या बाबींचा अपेक्षेइतका विकास नाही.

(११) तंत्रज्ञानाचा दर्जा : तंत्रज्ञानाचा दर्जा कमी राहिल्याने कृषी प्रति हेक्टरी उत्पादकता तसेच उद्योग क्षेत्राची प्रति कामगार उत्पादकता कमी आहे.

## भारतीय अर्थव्यवस्थेची उपक्षेत्रे

राष्ट्रीय उत्पन्न गणनेसाठी CSO ने अर्थव्यवस्थेचे विभाजन पुढील ९ गट व उपक्षेत्रात केले

① कृषी वानिकी आणि मत्स्यव्यवसाय : i) पीके ii) पशुधन iii) वनिकी व लाकुडतोड

② खाणकाम

③ कारखानदारी

④ वीज गॅस, व पाणीपुरवठा

⑤ बांधकाम

⑥ व्यापार, हॉटेल्स व रेस्टॉरंट - i) व्यापार ii) रेस्टॉरंट, हॉटेल

⑦ वाहतूक, साठवणूक व संचार - i) रेल्वे ii) इतर वाहतुक iii) साठवणूक iv) संचार

## * भारतीय राष्ट्रीय उत्पन्न गणनेच्या पद्धती :

सध्या CSO मार्फत GDP च्या गणनेसाठी ⇒

i) वस्तू उत्पादक क्षेत्रासाठी (कृषी व उद्योग) ⇒ उत्पादन पद्धती.

ii) सेवा क्षेत्रासाठी ⇒ उत्पन्न पद्धत

iii) बांधकाम क्षेत्रासाठी अ) ग्रामीण बांधकामासाठी - खर्च पद्धत

ब) शहरी —॥— - वस्तू प्रवाह पद्धत.

## मौद्रिक GDP व वास्तविक GDP

⇒ बाजारभावाने मोजलेल्या GDP ला मौद्रिक GDP तर स्थिर किंमतीला मोजलेल्या GDP ला वास्तविक GDP.

मौद्रिक GDP = अंतिम वस्तू X त्याच्या किंमती.

GDP च्या वाढीची कारणे - ① वस्तू व सेवांचे अधिक उत्पादन - (आर्थिक वृद्धीची सूचक)

② वाढत्या किंमती. (आभासी वाढ)

म्हणून किंमत वाढीचा प्रभाव काढून टाकल्यास - वास्तविक GDP प्राप्त.

### चालू किंमती, स्थिर किंमती, आधारभूत वर्ष.

चालू किंमत ⇒ संबंधित वर्षातील प्रचलित किंमतींना म्हणतात ⇒ त्या वर्षातील चालू किंमतीला मोजलेल्या GDP ला मौद्रिक GDP म्हणतात.

आधारभूत वर्ष व स्थिर किंमत ⇒ किंमतीच्या दृष्टीने सामान्य असणारे वर्ष म्हणजेच ज्या वर्षात किंमतीमध्ये मोठी चढउतार झालेली नसते असे वर्ष आधारभूत वर्ष

Scanned by CamScanner

* आधारभूत वर्षाचा किंमत निर्देशांक १०० मानला जातो.
* स्थिर किंमतीमध्ये वाढणाऱ्या उत्पादनाचा विचार केला जातो परंतु किंमत आधारभूत वर्षाचीच ग्राह्य धरली जाते.

उदा. समजा - 2000 साल आधारभूत वर्ष - पेनची किंमत 10 रु

| | मौद्रिक GDP | वास्तविक GDP |
|---|---|---|
| 2000 ⇒ | उत्पादन 100 पेन × 10 = 1000 | उत्पादन 100 पेन × 10 = 1000 |
| 2001 ⇒ | उत्पादन 150 पेन × 15 = 2250 | उत्पादन 150 पेन × (10) = 1500 |
| 2002 ⇒ | उत्पादन 200 पेन × 20 = 4000 | उत्पादन 200 पेन × (10) = 2000 |

] आधारभूत वर्षाची किंमत.

उदा. 2002 चा स्थिर किंमतीचा GDP

$$\frac{\text{2002 च्या चालू किंमतीला GDP} \times \text{आधारभूत वर्ष निर्देशांक}}{\text{2002 च्या किंमत निर्देशांक}}$$

भारतातील आधारभूत वर्षाच्या शृंखला :

i) CSO ने स्थापनेनंतर राष्ट्रीय उत्पन्नाच्या गणनेसाठी १९४८-४९ हे आधारभूत वर्ष निर्धारित केले. त्याआधारावर १९५६ साली सर्वप्रथम राष्ट्रीय उत्पन्नाची आकडेवारी प्रसिद्ध. यावेळी अर्थव्यवस्था १३ क्षेत्रात विभागली होती.

ii) ऑगस्ट १९६७ पासून १९६०-६१ हे आधारभूत वर्ष : वर्गीकरण ३ क्षेत्रामध्ये (प्राथ/द्वितीयक/तृतीय) व १२ उपक्षेत्रे.

iii) जाने १९७८ पासून १९७०-७१ हे आधारभूत वर्ष — ३री शृंखला

- १९८८ — " — १९८०-८१ — " — ४थी
- १९९९ — " — १९९३-९४ — " — ५वी
- जाने २००६ — " — १९९९-२००० — " — ६वी.

iv) जाने २०१० — " — 2004-05 — " — ७वी शृंखला (हे वर्ष अभिजित सेन गुप्ता कार्यदलाच्या शिफारशीनुसार)

v) सध्या जाने २०१५ — " — 2011-12 — " — ८वी शृंखला (के. सुंदरम सत्यनारायण समिती शिफारस)

जी.डी.पी अवस्फीतीक

प्रत्येक वर्षासाठी चालू किंमतीला मौद्रिक GDP तर स्थिर किंमतीला वास्तविक GDP मोजला जातो.

⇒ मौद्रिक GDP व वास्तविक GDP यांच्या भागाकाराला जी.डी.पी अवस्फीतीक म्हणतात.

⇒ GDP अवस्फीतीक वरून त्या वर्षाच्या किंमतीची आधारभूत वर्षाच्या किंमतीशी तुलना

Scanned by CamScanner

कोठी जाते.

i) आधारभूत वर्षाचा GDP अवस्फितीक 1 असतो.

ii) अवस्फितीक १ पेक्षा जास्त असल्यास किंमती आधारभूत वर्षाच्या किंमतीपेक्षा अधिक तर

— " — १ पेक्षा कमी असल्यास — " — कमी असतात

## भारताचा GDP

| | GDP वृध्दीदर | दरडोई |
|---|---|---|
| २०१२-१३ | ५.६% | ७१,०५० रु |
| २०१३-१४ | ६.६% | ७९४१२ रु |
| २०१४-१५ | ७.२% | ८६८७९ रु |
| २०१५-१६ | ७.६% | ९३२३१ रु. |

## भारताच्या GDP चे क्षेत्रीय वितरण :

| वर्ष | कृषी क्षेत्र % हिस्सा | उद्योग क्षेत्र % हिस्सा | सेवा क्षेत्र % हिस्सा |
|---|---|---|---|
| १९५०-५१ | ५३.१ | १६.६ | ३०.३ |
| ६०-६१ | ४८.७ | २०.५ | ३०.८ |
| ७०-७१ | ४२.३ | २४ | ३३.८ |
| ८०-८१ | ३६.१ | २५.९ | ३८.० |
| ९०-९१ | २९.६ | २७.७ | ४२.७ |
| २०००-०१ | २२.३ | २७.३ | ५०.४ |
| २००५-०६ | १८.३ | २८ | ५३.५ |
| २०१०-११ | १४.६ | २७.९ | ५७.५ |
| ११-१२ | १४.४ | २८.२ | ५७.४ |
| १२-१३ | १३.९५ | २७.२८ | ५८.८ |
| १३-१४ | १३.९४ | २६.१३ | ५९.९ |
| १४-१५ PE | १६.११ | ३१.३७ | ५२.५ |

i) कृषी क्षेत्राचा हिस्सा सतत कमी होत गेला सेवा क्षेत्राचा हिस्सा सतत वाढत गेला. उद्योग क्षेत्राचा हिस्साही वाढत गेला मात्र अलिकडे उद्योग क्षेत्राचा हिस्सा साधारणतः स्थिर आहे.

ii) कृषिधारित अर्थव्यवस्थेची सेवाधारित अर्थव्यवस्थेकडे वाटचाल.

iii) कृषी व उद्योग क्षेत्राच्या दीडपट सेवा क्षेत्राचा हिस्सा

## भारताचे जागतिक अर्थव्यवस्थेतील स्थान :

— जागतिक बँकेचा 'जागतिक विकास अहवाल' WDR (World Development Report)

— आय एम एफ 'जागतिक आर्थिक परिदृश्य अहवाल (World Economic Outlook)

जागतिक बँक दरवर्षी १ जुलैरोजी (बँकेच्या आर्थिक वर्षाची सुरुवात) जगातील देशांचे विविध उत्पन्न गटामध्ये (कमी, मध्यम व उच्च) वर्गीकरण करते (दरडोई स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या) आधारे

Scanned by CamScanner

भारताची गणना सध्या निम्न मध्यम उत्पन्न देशांच्या गटामध्ये करण्यात आली आहे.



## GNI नुसार क्रमवारी :

विविध देशांच्या GNI ची तुलना करण्यासाठी प्रत्येक देशाच्या GNI चे रुपांतर डॉलर मुल्यामध्ये करणे गरजेचे असते.

रुपांतर दोन प्रकारच्या दरांनी → 1) मौद्रिक विनिमय दर
2) वास्तविक विनिमय दर.

→ मौद्रिक विनिमय दर दोन चलनांच्या खरेदी -विक्रीचा दर दर्शवितो.

→ वास्तविक विनिमय दर दोन चलनांच्या तुलनात्मक खरेदीशक्तीचा दर दर्शवितो. त्यामुळे त्याला खरेदी शक्ती समानतेचा किंवा क्रयशक्ती समानतेचा दर म्हणतात ( Parchasing Power Parity)

→ जागतिक बँकेच्या 2016 च्या अहवालानुसार या दोन्ही दरानुसार भारताचा क्रमांक.

| सर्वाधिक GNI (मौद्रिक दरानुसार) | सर्वाधिक GNI (PPP नुसार) |
|---|---|
| 1) यु.एस.ए. | 1) यु.एस.ए. |
| 2) चीन | 2) चीन |
| 3) जपान | 3) भारत |
| 4) जर्मनी | 4) जपान |
| 5) यु.के | 5) जर्मनी. |
| 6) फ्रान्स | |
| 7) भारत | |

कार्ल कॅसेल या ब्रिटीश अर्थतज्ञाने PPP ही संकल्पना सुचविली.

## क्रयशक्ती समानता : (PPP)

कोणत्याही देशाच्या चलनाच्या खरेदीशक्तीची अमेरिकेच्या डॉलरच्या खरेदीशक्तीशी तुलना.

**हरित GDP =** पारंपारिक GDP — पर्यावरणीय हानीचे मुल्य.
चीनने सर्वप्रथम 2006 साली 2004 या वर्षाचे हरित GDP चे आकडे प्रकाशित केले — परंतु 2007 पासून या पद्धतीचा त्याग केला.
भारतात सर पार्थ दासगुप्ता यांनी एप्रिल 2013 मध्ये Green National Accounts in India - A Framework या नावाने सादर केलेल्या अहवालात Green GDP उल्लेख

Scanned by CamScanner